लोकसत्ता नागपूर, शुक्रवार, १ जानेवारी २०१०

# दारूच्या पैशावर घरे पोसली जात असल्याने राजकीय नेते एकत्र -डॉ. बंग



**चंद्रपूर, ३१ डिसेंबर / प्रतिनिधी**

राजकीय नेत्यांची घरे दारूच्या पैशावर पोसली जात असल्यामुळेच धान्यापासून दारू निर्मितीच्या मुद्यावर सर्व राजकीय नेते एकजूट दाखवत आहेत, अशी टीका ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी आज येथे बोलताना केली.

आता एकजूट दाखवणारे नेते देशहितासाठी कधी एकत्र आले काय, असा सवाल त्यांनी केला. येथील जिल्हा सर्वोदय मंडळातर्फे सेवादलाच्या सभागृहात आयोजित एक दिवसाच्या संमेलनाचे उद्घाटन केल्यानंतर डॉ. बंग यांनी धान्यापासून दारू निर्मितीच्या मुद्यावर विचार मांडले. या योजनेला राज्यातील सर्व पातळीवरून विरोध सुरू झाल्याबरोबर आता राजकीय नेते ही दारू निकृष्ट धान्यापासून तयार केली जाते, असे स्पष्टीकरण देत आहेत. डॉ. बंग यांनी भाषणात त्याचा खरपूस समाचार घेतला.

ज्या देशातले लोक धान्य मिळत नाही म्हणून उंदीर व किडे खातात, अशा देशाचे नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांनी निकृष्ट धान्याचे उदाहरण द्यावे हेच मुळात चूक आहे. अन्न साखळीचा विचार केला तर निकृष्ट धान्यसुद्धा त्यातील एक महत्त्वाचा घटक आहे. कोंबडीसारखे अनेक प्राणी केवळ या धान्यावर जगतात. म्हणूनच सरकारचे हे धोरण मानवाच्या अन्नावर घाला घालणारे आहे, अशी टीका त्यांनी केली.

सध्या राज्यात धान्यापासून दारू बनवणारे ३६ कारखाने आहेत. त्याच्या संचालक मंडळाच्या यादीवरून नुसती नजर फिरवली तरी राजकीय नेते या धोरणाचे समर्थन का करत आहेत, या प्रश्नाचे उत्तर मिळते. म्हणूनच हे नेते आता पक्षभेद विसरून एकत्र आले आहेत. 'तेरीभी चुप और मेरीभी चुप' अशातलाच हा प्रकार आहे.

मुख्यमंत्री अशोक चव्हाण यापुढे नवे कारखाने सुरू करायला परवानगी दिली जाणार नाही, असे सांगतात. मुळात एवढेच कारखाने राज्याचा नाश करायला पुरेसे आहेत. दारूच्या संदर्भात सरकारला निर्णय फिरवण्याचा घटनात्मक अधिकार आहे. गडचिरोलीतील दारूबंदीच्या वेळी सरकारने परवाने रद्द केले होते व या निर्णयाचे न्यायालयाने समर्थन केले होते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

या कारखान्यातून २६ लाख लिटर दारू निर्मिती होणार आहे. दहा हजार कोटींची ही दारू पुन्हा शेतकऱ्यांच्याच घशात जाणार आहे. केंद्राने जेवढ्या रकमेची कर्जमाफी दिली तेवढीच रक्कम सरकार शेतकऱ्याच्या खिशातून काढून घेणार आहे, असा हा सरळ सरळ हिशेब आहे, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या एकूण

पान ८ वर ➤

## 'निर्माण'चे युवक कार्यकर्ते आजपासून प्रतिकात्मक उपोषणावर

**नागपूर, ३१ डिसेंबर/प्रतिनिधी**

धान्यापासून दारू निर्मितीचा निर्णय घेऊन राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात धान्याधारित 'आसवनी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य-२००७' या योजनेअंतर्गत दारू उत्पादकांना कोट्यवधी रुपयाची सबसिडी मंजूर केली आहे. जागतिक भूक निर्देशांकात ११९ देशांमध्ये भारत ९४ व्या क्रमांकावर असताना आणि देशातील २३ कोटी जनता कुपोषित असताना, अशा देशातील राज्य शासनाने असा निर्णय घेणे पूर्णपणे चुकीचे आहे. शासनाच्या या निर्णयाचा विरोध करण्यासाठी 'निर्माण'चे युवक कार्यकर्ते १ जानेवारी २०१० पासून वैयक्तिक पातळीवरील प्रतिकात्मक उपोषणाची मानवी साखळी तयार करत आहेत. शासनाच्या या योजनेअंतर्गत किमान ३० हजार लीटर प्रती दिवस तर, कमाल सव्वा लाख लीटर प्रती दिवस दारू निर्मिती होणार आहे. या योजनेसाठी वर्षाला ८ लाख टन धान्य दारूसाठी वापरले जाणार आहे. यामुळे धान्याच्या किमतीत प्रचंड वाढ होऊन येत्या काही वर्षात अन्नधान्याची तीव्र टंचाई निर्माण होईल, दारू पिणाऱ्यांचे प्रमाण वाढेल व त्याचे अनिष्ट परिणाम समाजाला भोगावे लागतील. राज्यातील गरीब जनतेला चढ्या भावाने धान्य विकत घेणे परवडणारे नाही. राज्यातील बहुसंख्य जनता अन्नधान्यासाठी रेशनिंग वितरण व्यवस्थेवर अवलंबून आहे. या व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर काळाबाजार चालतो. जर अन्नधान्यापासून दारूनिर्मितीला प्रोत्साहन दिले तर रेशनिंगमधील मोठा अन्नसाठा दारूनिर्मितीसाठी उद्योजकांकडे वळवला जाईल. राज्य शासनाच्या या निर्णयाचा विरोध करण्यासाठी 'निर्माण'चे दोन प्रतिनिधी नव्या वर्षाची सुरुवात या संकल्पाने करीत आहेत. त्यानंतर रोज काही नवीन सहकारी ही साखळी पुढे चालवतील. महाराष्ट्रातील जनतेने व विशेषतः युवकांनी या उपक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन 'निर्माण'ने केले आहे. ■